ISSN 2349-638x

दयानंद शिक्षण संस्था, संचलित

# दयानंद कला महाविद्यालय, लातूर

# मराठी अर्थशास्त्र परिषद

## 47 वे वार्षिक राष्ट्रीय अधिवेशन

30,31 जानेवारी व 1 फेब्रुवारी, 2025

Volume -1







## Aayushi International Interdisciplinary Research Journal

Monthly Peer Reviewed Journal
Impact Factor 8.02
website : www.aiirjournal.com
email id : aiirjpramod@gmail.com

Executive Editor
Dr. Balaji T. Ghute

Chief Editor
Dr.Pramod P.Tandale

| Sr. No. | Name of the Author | Title of Paper | Page No. |
|---|---|---|---|
| 17. | उज्वला क. बांगर | विवाहाचा स्त्री श्रमबाजारावर होणारा परिणाम अभ्यासणे विशेष संदर्भ कल्याण शहर | 82 |
| 18. | डॉ. वैशाली जोशी | जागतिक आर्थिक विचारांचे धनी | 87 |
| 19. | डॉ. विजयानंद अभिमन वारडे | अर्थशास्त्रातील नोबेल पारितोषिक विजेत्यांचे सामाजिक योगदान | 91 |
| 20. | प्रा.डॉ.श्रीकांत मारुती फुलसुंदर | अभिजीत बॅनर्जी आणि एस्थर डफ्लो यांच्या अर्थशास्त्रीय विचारांचे सामाजिक योगदान | 98 |
| 21. | डॉ.आत्माराम बी. मुळीक, डॉ.राहुल शं. म्होपरे | नोबेल पारितोषिक विजेते अर्थतज्ञ डॉ.अभिजीत बॅनर्जी यांचे आर्थिक विचार | 103 |
| 22. | प्रा. डॉ. सुभाष रामचंद्र गुर्जर | नोबेल पुरस्कार प्राप्त अर्थतज्ञ प्रो.अभिजीत बॅनर्जी व डॉ.क्लाऊडीया गोल्डिनचे आर्थिक विचार | 108 |
| 23. | विश्वजीत दिलीप कदम | एसमोग्लू, जॉन्सन आणि रॉबिन्सन यांच्या सैद्धांतिक मांडणीचे टीकात्मक विश्लेषण | 112 |
| 24. | डॉ. प्रतिमा बाळासाहेब कदम, डॉ. हर्षद लक्ष्मण जाधव | नोबेल पारितोषिक विजेते अर्थतज्ञ अभिजीत बॅनर्जी यांचे अर्थशास्त्रातील योगदान | 120 |
| 25. | ज्योती प्रविणचंद्र पाटील, डॉ.नासिकेत गोविंदराव सूर्यवंशी | क्लाउडी गोल्डिन यांचे आर्थिक विचार व भारतातील महिलांकरिता त्याचे उपयोजन | 125 |
| 26. | श्री. महाजन शुभम अविनाश | अर्थशास्त्र विषयातील नोबेल पारितोषिक विजेते अभिजीत बॅनर्जी यांचे आर्थिक विचार | 130 |
| 27. | प्रा.डॉ.गाडेकर बी.पी. | रिचर्ड एच.थॅलर यांच्या वर्तमानी आर्थिक वर्तन आणि निर्णय प्रक्रियेवरील संशोधनाचे परिणाम : एक विश्लेषण | 135 |
| 28. | डॉ.बालासाहेब वैजनाथ मेंद, रेश्मा जहीरोद्दीन तांबोळी | प्रा.अभिजीत बॅनर्जी यांचा जागतिक गरिबीविषयीचा दृष्टीकोन : एक अभ्यास | 141 |
| 29. | प्रा. गोविंद पुंडलिक पवार | २०१५ पासूनच्या अर्थशास्त्रातील नोबेल स्मृती पारितोषिक प्राप्त अर्थतज्ञांचे आर्थिक विचार | 145 |
| 30. | डॉ. हरिष एम. बावनगडे | २०२४ च्या अर्थशास्त्रातील नोबेल स्मृती पुरस्कार प्राप्त अर्थतज्ञाचे आर्थिक विचार | 154 |
| 31. | डॉ. माधुरी वर्तले-सपाटे | आधुनिक महिला सबलीकरण घडविण्यात आर्थिक विज्ञानातील क्लॉडिया गोल्डिनचे योगदान | 157 |
| 32. | नितीन ज्ञानदेव चौधरी, हनुमंत अंकुशराव भोसले | अभिजित बॅनर्जी आणि एस्थर डफ्लो यांच्या गरिबीचे अर्थशास्त्र या ग्रंथाच्या दृष्टिकोनातून दारिद्रय निर्मूलन | 163 |

# नोबेल पारितोपिक विजेते अर्थतज्ञ डॉ.अभिजीत बॅनर्जी यांचे आर्थिक विचार

* डॉ.आत्माराम बी. मुळीक ** डॉ.राहुल शं. म्होपरे
* सहाय्यक प्राध्यापक, अर्थशास्त्र विभाग वेणूताई चव्हाण कॉलेज कराड सातारा अजीव सभासद क्र.
ईमेल आयडी : drabmulik@gmail.com
** सहयोगी प्राध्यापक, अर्थशास्त्र विभाग देवचंद कॉलेज अर्जुननगर कोल्हापूर अजीव सभासद क्र. ११९८
ईमेल आयडी : rahulmhopare@rediffmail.com

**गोषवारा :**

*नोबेल पारितोषक हे जगातील सर्वात मोठे पारितोषिक आहे. मानव जातीच्या कल्याणासाठी संशोधन करणाऱ्या संशोधकास नोबेल पारितोषिक दिले जाते. २०१९ चे अर्थशास्त्रातील नोबेल पारितोषिक डॉ.अभिजीत बॅनर्जी, एस्थर डुफ्लो आणि मायकल क्रेमर या तीन अर्थशास्त्रज्ञांना मिळालेले आहे. त्यापैकी भारतीय अर्थशास्त्रज्ञ डॉ. अभिजीत बॅनर्जी यांच्या आर्थिक विचारांचे अध्ययन प्रस्तुत शोधनिबंधात करण्यात आले आहे.*

**प्रस्तावना :**

जगप्रसिद्ध शास्त्रज्ञ अल्फ्रेड नोबेल यांच्या नावाने संपूर्ण जगातील मानव जातीच्या विकासासाठी संशोधन करणाऱ्या संशोधकांना नोबेल पारितोषिक दिले जाते. नोबेल पारितोषिक मिळणे हा जागतिक पातळीवरील खुप मोठा सन्मान समजला जातो. हे पारितोषिक नोबेल यांच्या इच्छेवरून १९०१ पासून दिले जाते. हे पारितोषिक भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, साहित्य, शरीरविज्ञान/वैद्यकशास्त्र, शांतता आणि १९६९ पासून अर्थशास्त्र या विषयासाठी दिले जाते. अर्थशास्त्रातील २०१९ चे नोबेल पारितोषिक अभिजीत बॅनर्जी, एस्थर डुफ्लो आणि मायकल क्रेमर या तीन अर्थशास्त्रज्ञांना मिळाले होते. त्यापैकी डॉ. अभिजीत बॅनर्जी हे भारतीय अर्थशास्त्रज्ञ आहेत.

डॉ. अमर्त्य सेन यांच्यानंतर अर्थशास्त्रातील नोबेल मिळवणारे डॉ.अभिजीत बॅनर्जी हे दुसरे भारतीय आहेत. त्यांच्या आर्थिक विचारांचे अध्ययन करण्याच्या उद्देशाने प्रस्तुत शोधनिबंधासाठी 'नोबेल पारितोषिक विजेते अर्थतज्ञ डॉ.अभिजीत बॅनर्जी यांचे आर्थिक विचार' या विषयाची निवड करण्यात आली आहे.

**संशोधनाची उद्दिष्टे :**

१) अर्थशास्त्रातील नोबेल पारितोषिकाचा इतिहास अभ्यासणे.
२) नोबेल पारितोषिक विजेते अर्थतज्ञ डॉ.अभिजीत बॅनर्जी यांच्या जीवन परिचयाचा अभ्यास करणे.
३) नोबेल पारितोषिक विजेते अर्थतज्ञ डॉ.अभिजीत बॅनर्जी यांच्या आर्थिक विचारांचे अध्ययन करणे.

**संशोधन पद्धती :**

प्रस्तुत विषयाच्या संशोधनासाठी वर्णनात्मक व विश्लेषणात्मक संशोधन पद्धतीचा उपयोग करण्यात आला असून माहिती संकलनासाठी द्वितीय साधनसामग्रीचा उपयोग करण्यात आला आहे. या अंतर्गत डॉ.अभिजीत बॅनर्जी यांचे स्वलिखित ग्रंथ, संदर्भ ग्रंथ, पुस्तके,लेख, शोध निबंध,वर्तमानपत्र व वेबसाईट इत्यादी साधनांचा वापर केला आहे.

**संशोधनाची व्याप्ती व मर्यादा :**

प्रस्तुत अध्ययन २०१९ चे अर्थशास्त्रातील नोबेल पारितोषिक प्राप्त अर्थशास्त्रज्ञ असून हे पारितोषिक अभिजीत बॅनर्जी, एस्थर डुफ्लो आणि मायकल क्रेमर या तीन अर्थशास्त्रज्ञांना मिळालेले आहे. या विषयाची व्याप्ती व्यापक असल्यामुळे सदर शोधनिबंधामध्ये केलेला अभ्यास डॉ. अभिजीत बॅनर्जी यांच्या आर्थिक विचाराशी मर्यादित आहे.

**विषय स्पष्टीकरण :**

प्रस्तुत विषयाच्या स्पष्टीकरणांमध्ये अर्थशास्त्रातील नोबेल पारितोषिकाचा इतिहास, अर्थतज्ञ डॉ.अभिजीत बॅनर्जी यांचा जीवन परिचय व त्यांचे आर्थिक विचार इत्यादी घटकांचे विश्लेषण करण्यात आले आहे.

**अर्थशास्त्रातील नोबेल पारितोषिकाचा इतिहास :**

अर्थशास्त्रातील जगप्रसिद्ध नोबेल पारितोषिकाची स्थापना १९६८ मध्ये स्वीडिश केंद्रीय बँकेने (Sveriges Riksbank) केली असून हे पारितोषिक, "स्वीडिश बँक पुरस्कार इन इकॉनॉमिक्स इन मेमोरी ऑफ अल्फ्रेड नोबेल" म्हणून ओळखले जाते. अर्थात अल्फ्रेड नोबेलच्या इच्छेनुसार, अर्थशास्त्राचे पारितोषिक स्थापन केले नसून स्वीडिश बँकेने अल्फ्रेड नोबेल यांच्या नावाने या पारितोषिकाची स्थापना केली असल्याचे दिसून येते.

अर्थशास्त्रातील प्रथम नोबेल पारितोषिक १९६९ मध्ये रागनर फ्रिश आणि जॉर्ज स्टीग्लर यांना देण्यात आले असून यानंतर अनेक अर्थशास्त्रज्ञांना हे पारितोषिक प्रदान करण्यात आले असल्याचे दिसून येते. भारतात सर्वप्रथम १९९८ मध्ये डॉ. अमर्त्य सेन यांना हे पारितोषिक मिळाले असून अर्थशास्त्रातील नोबेल मिळवणारे ते पहिले भारतीय म्हणून ओळखले जातात. त्यानंतर २०१९ मध्ये नोबेल मिळवणारे अभिजीत बॅनर्जी हे दुसरे भारतीय आहेत. जगभरातील अनेक अर्थतज्ज्ञांना त्यांनी केलेल्या महत्त्वपूर्ण संशोधनाबद्दल आजवर नोबेल पारितोषिक प्राप्त झाले आहे.

थोडक्यात नोबेल पारितोषिकाने अर्थशास्त्राच्या अभ्यासात महत्त्वपूर्ण योगदान दिले असून आर्थिक संकल्पना, विचार व सिद्धांत विकसित करण्यास जगभरातील संशोधकांना प्रेरित केले असल्याचे दिसून येते.

**अर्थतज्ञ डॉ.अभिजीत बॅनर्जी यांचा जीवन परिचय :**

डॉ.अभिजीत बॅनर्जी हे एक जगप्रसिद्ध भारतीय अमेरिकन अर्थतज्ञ आहेत. त्यांचा जन्म भारत देशाच्या महाराष्ट्र राज्यातील मुंबई या ठिकाणी २१ फेब्रुवारी १९६१ रोजी झाला. त्यांचे संपूर्ण नाव अभिजीत विनायक बॅनर्जी त्यांची आई निर्मला बॅनर्जी व वडील विनायक बॅनर्जी हे दोघेही अर्थशास्त्राचे प्राध्यापक होते. अभिजीत बॅनर्जी यांनीही अध्ययन व संशोधनासाठी अर्थशास्त्र हा विषय निवडला असल्याचे दिसून येते.

अभिजीत बॅनर्जी यांच्या शिक्षणाची सुरुवात महाराष्ट्र राज्यातील मुंबई येथील जैविक विज्ञान संस्थेतून झाली असून बी.एस.सी.१९८१ मध्ये कलकत्ता विद्यापीठामधून, एम.ए. अर्थशास्त्र १९८३ मध्ये जवाहरलाल नेहरू विद्यापीठामधून,अर्थशास्त्र विषयातून पीएचडी पदवी १९८८ मध्ये हार्वर्ड विद्यापीठामधून प्राप्त केली. त्यानंतर त्यांनी १९८८ ते १९९२ या काळात प्रिन्स्टन विद्यापीठात, ९९२-९३ मध्ये हार्वर्ड आणि १९९३ पासून अमेरिकेतील मॅसॅच्युसेट्स इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी (MIT) येथे अर्थशास्त्राचे अध्यापन केले.

जगप्रसिद्ध फोर्ड फाऊंडेशन MIT मध्ये २००३ रोजी त्यांची अर्थशास्त्राचे आंतरराष्ट्रीय प्राध्यापक म्हणून नियुक्ती करण्यात आली. २००३ मध्ये त्यांनी आणि एस्थर डुफ्लो यांनी, MIT मधील अर्थशास्त्रज्ञ सेंधिल मुल्लैनाथन यांच्यासमवेत 'अब्दुल लतीफ जमील पॉव्हर्टी ॲक्शन लॅब' (J-PAL) ची स्थापना केली असून ही लॅब जागतिक गरिबी कमी करण्यासाठी वैज्ञानिकदृष्ट्या माहितीपूर्ण धोरण तयार करण्यास समर्थन देणारे संशोधन केंद्र आहे.

बॅनर्जी आणि एस्थर डुफ्लो यांचे २०१५ मध्ये लग्न झाले असून त्यांना दोन मुले आहेत. एस्थर डुफ्लो या त्यांच्या दुसऱ्या पत्नी असून त्यांची पहिली पत्नी अरुंधती तुली या असून २०१४ मध्ये त्या विभक्त झाल्या. त्यांना एक मुलगा होता. २०१६ रोजी त्या मुलाचे दुःखद निधन झाले. अशा पद्धतीने अभिजीत बॅनर्जी यांच्या वाट्याला संघर्षमय जीवन आल्याचे दिसून येते. जे.एन.यू. मध्ये विद्यार्थी असताना आंदोलनासाठी त्यांना तिहार तुरुंगात काही दिवस रहावे लागले होते.

अभिजीत बॅनर्जी यांनी विविध जर्नल मध्ये विविध विषयावर लेख लिहिले असून अनेक जर्नलचे रेफ्री, संपादक म्हणून काम केले आहे. त्यांनी जागतिक विकास केंद्र, जागतिक बँक संशोधन, आर्थिक व राजकीय संशोधन केंद्र, राष्ट्रीय ब्युरो आर्थिक इत्यादी मध्ये सदस्य म्हणून व आर्थिक विश्लेषण व विकास संशोधन ब्युरोचे अध्यक्ष म्हणून कार्य केले आहे. तसेच अभिजीत बॅनर्जी यांनी आजवर अनेक पुस्तकांचे व संदर्भ ग्रंथांचे लेखन केले आहे २००५ मध्ये व्हॉलेटली अँड थ्रोन, २००६ मध्ये अंडरस्टँडिंग पावर्टी, २००७ मध्ये मेकिंग एड व २०११ मध्ये पुअर इकॉनॉमिक्स २०१९ मध्ये गुड इकॉनॉमिक्स फॉर हार्ड टाइम्स इत्यादी पुस्तक त्यांनी व त्यांच्या पत्नी एस्थर डुफ्लो यांनी मिळून लिहिले असल्याचे दिसून येते.

अभिजीत बॅनर्जी यांनी दिलेल्या अर्थशास्त्रातील योगदानाबद्दल अनेक पुरस्कारांनी त्यांना सन्मानित करण्यात आले. २०१९ साली अर्थशास्त्रातील सर्वोच्च मानले जाणारे नोबेल पारितोषिक त्यांच्या पत्नी एस्थर डुफ्लो आणि मायकल क्रेमर यांच्या सहकार्याने विकास अर्थशास्त्रातील प्रयोगात्मक पद्धतीच्या उपयोगाबद्दल मिळाले. त्यांच्या संशोधनामुळे जगभरातील विकास

धोरणांवर मोठा प्रभाव पडला आहे. त्यांच्या कामात एकत्रितपणे प्रयोगात्मक आणि श्रममार्गदर्शक पद्धतीचा उपयोग केला जातो, ज्यामुळे गरिबी कमी करण्याच्या उपाययोजनांचे मूल्यांकन करण्यास मदत होत असल्याचे दिसून येते.

**अर्थतज्ञ डॉ.अभिजीत बॅनर्जी यांचे आर्थिक विचार :**

जगप्रसिद्ध अर्थशास्त्रज्ञ डॉ.अभिजीत बॅनर्जी यांच्या अभ्यासाचा व अध्यापनाचा विषय अर्थशास्त्र असून त्यांचे अर्थशास्त्रातील अभ्यासाचे क्षेत्र विकास अर्थशास्त्र, गरिबीचे अर्थकारण, माहिती तंत्रज्ञान, उत्पन्न, वितरणाचे सिद्धांत, स्थूल अर्थशास्त्र, मायक्रोफायनान्स इत्यादी विषय असून या विषयात त्यांनी नाविन्यपूर्ण प्रयोगकरून महत्त्वपूर्ण संकल्पना व विचार दिले आहेत. ते खालील प्रमाणे आहेत.

१) **अर्थशास्त्रामध्ये प्रायोगिक दृष्टीकोन** :अर्थशास्त्रामध्ये बॅनर्जी, डुफ्लो आणि क्रेमर यांनी अनेक क्षेत्रांमध्ये प्रायोगिक दृष्टीकोन लागू केला. ज्यात शिक्षण,आरोग्य,औषध,कर्ज मिळवणे आणि नवीन तंत्रज्ञानाचा अवलंब करणे इत्यादी घटक समाविष्ट असल्याचे दिसून येते. एक उदहारण म्हणून आरोग्य क्षेत्रात त्यानी केलेले प्रायोगिक संशोधन खालील प्रमाणे आहे. मोबाइल क्लिनिक सुरू केल्याने भारतात बाल- लसीकरण दर (पूर्णपणे लसीकरण झालेल्या मुलांची टक्केवारी) लक्षणीयरीत्या वाढेल या गृहितकाची चाचणी,बॅनर्जी आणि डुफ्लो यांनी केली त्यांना असे आढळून आले की ज्या गावांना यादृच्छिकपणे फिरत्या दवाखान्यांद्वारे भेटी देण्यासाठी निवडण्यात आले होते त्या गावांमध्ये लसीकरणाचे दर मोबाइल क्लिनिक सुरू न केलेल्या गावांमधील दरापेक्षा तिप्पट आहेत आणि कुटुंबांना मसूराची पोती दिल्यास लसीकरण दर सहा पटीने वाढले असल्याचे दिसून आले.

२) **आर्थिक वाढ आणि विकास** : अभिजीत बॅनर्जी आणि त्यांच्या पत्नी एस्थर डुफ्लो यांनी आर्थिक वाढ आणि विकासाला चालना देण्यासाठी मायक्रो क्रेडिट कर्ज कार्यक्रमाच्या परिणामकारकतेची चाचणी घेण्यासाठी भारतातील हैदराबाद या ठिकाणी फिल्ड प्रयोग केले त्या प्रयोगांमधून त्यांना असे दिसून आले की,मायक्रोक्रेडिट कर्ज कार्यक्रमांमुळे लहान-व्यवसायाची गुंतवणूक किंवा नफा लक्षणीयरीत्या वाढला नाही आणि आर्थिक वाढ आणि विकासाचे इतर निर्देशक जसे की दरडोई उपभोग, आरोग्य आणि मुलांचे शिक्षण सुधारले नाही. इतर संशोधकांनी केलेल्या अनेक कमी आणि मध्यम उत्पन्न देशांच्या नंतरच्या अभ्यासाने त्या परिणामांची पुष्टी केली असल्याचे दिसून येते.

३) **भारतीय अर्थव्यवस्थेचा आकार** : अलीकडच्या काळात भारत सरकार ५ ट्रिलियन अर्थव्यवस्थेच्या दिशेने पावले टाकत आहे. हे कसे शक्य होईल? या विषयावर अभिजीत बॅनर्जी यांचा विचार असा आहे की, सद्य:स्थितीत भारताचा विकास दर संथ होत आहे कारण सध्या देशातील मागणी कमकुवत आहे. अर्थात मागणी वाढणे आवश्यक आहे त्यासाठी गरिबांच्या हाती अधिक पैसा देऊन बाजारातील मागणीत वाढ केल्यास भारतीय अर्थव्यवस्थेचा आकार वाढेल.

४) **भारतीय अर्थव्यवस्थेतील त्रुटी** : भारतीय अर्थव्यवस्थेचा विस्तार ज्या वेगाने व्हायला पाहिजे त्या वेगाने होत नाही कारण भारतीय अर्थव्यवस्था अतिकेंद्रीकरणाने (ओव्हर सेंट्रलायझेशन) ग्रस्त झाली आहे ही भारतीय अर्थव्यवस्थेतील गंभीर त्रुटी आहे परिणामी अर्थव्यवस्थेच्या विस्तारास मर्यादा येत आहेत अर्थव्यवस्थेचा विकास वेगाने करावयाचा असल्यास देशातील संस्थांना कामाचे स्वातंत्र्य देणे अत्यंत आवश्यक आहे.

५) **राष्ट्रवाद आणि गरिबी** :अभिजीत बॅनर्जी यांनी राष्ट्रवाद आणि गरिबी याविषयी आपले विचार मांडले आहेत ते असे म्हणतात की, राष्ट्रवाद हा गरिबीच्या समस्येपासून धोरणकर्त्यांना दूर घेऊन जातो. विशेषता भारतासारख्या देशात राष्ट्रवाद गरिबी सारख्या महत्वाच्या मुद्द्यावरून लक्ष वळवताना दिसून येतो.

६) **किमान उत्पन्न हमी योजना** : अभिजीत बॅनर्जी किमान उत्पन्न हमी योजने विषयी असे म्हणतात की, ही योजना पाहिजे कारण असे बरेच लोक आहेत ज्यांना अचानक मोठ्या जोखमीचा सामना करावा लागतो. त्यांच्या आयुष्यातील सर्व काही नाहीसे होते कारण कधी कधी खुप पाऊस पडतो किंवा खुप कमी पाऊस पडतो,अचानक बँक बुडते आणि त्यामुळे इमारतीचे बांधकाम ठप्प होते, मंदी येते, अनेकांना रोजगार गमवावा लागतो. ही सर्व जोखीम कमी करणे आवश्यक आहे. जोखीम असलेल्या लोकांसाठी सुरक्षा जाळी असणे महत्वाचे आहे. त्यासाठी किमान उत्पन्न हमी योजना राबवणे आवश्यक आहे.

७) **टेलस्पिन अर्थव्यवस्था :** टेलस्पिन अर्थव्यवस्था" म्हणजे एक असी आर्थिक स्थिती जेव्हा आर्थिक धोरणांमध्ये झालेले अचानक बदल, बाजारातील नकारात्मक भावना, किंवा नैसर्गिक व अनैसर्गिक जागतिक घटनांचा परिणाम इत्यादी मुळे देशाची आर्थिक व्यवस्था अचानक गंभीरपणे अस्थिर होते. यामध्ये आर्थिक क्रियात मोठी घट होऊन रोजगाराची पातळी कमी होते, गुंतवणुकीत घट होते. या अवस्थेतून अर्थव्यवस्थेचे पुनरुत्थान कसे होईल हे निश्चित सांगणे कठीण असते. याविषयी अभिजित बॅनर्जी म्हणतात की, जेव्हा अर्थव्यवस्था टेलस्पिन अवस्थेत जातो तेव्हा आर्थिक स्थिरतेबद्दल जास्त काळजी न करता मागणी वाढविण्यासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे कारण मागणी ही एक मोठी गंभीर समस्या असते.

८) **हॅंडआउट इकॉनॉमिक्स :** हॅंडआउट इकॉनॉमिक्स हा एक विशेष आर्थिक सिद्धांत आहे. या अंतर्गत सरकारद्वारे जनतेला प्रत्यक्ष पैसे किंवा संसाधनांचे वाटप करण्याच्या पद्धतीशी संबंधित आहे. याचा मुख्य उद्देश्य सामाजिक सुरक्षा, गरीबी निर्मूलन आणि आर्थिक स्थिरता प्रस्थापित करणे असा आहे. अलीकडे हा शब्द अपमानास्पद अर्थाने वापरला जात आहे. कारण ज्या लोकांना सरकार अशा पद्धतीने मदत करते ते लोक आळशी होत आहेत असा विचार मांडला जातो. या संकल्पनेविषयी विचार मांडताना बॅनर्जी म्हणतात की, ब्राह्मणांना इतर लोकांकडून हॅंडआउट्स मिळतात अशी भारताची प्रदीर्घ परंपरा आहे. तेव्हा "हॅंडआउट्स" हा अपमानास्पद शब्द नव्हता मग आत्ताच तो अपमास्पद का वापरला जातो ज्यांना अशा पद्धतीचा लाभ दिला जातो ते आळशी असतात असे नाही ते खूप प्रयत्न करतात परंतु काही वेळा पाऊस पडत नाही किंवा काही वेळा अधिक पाऊस पडतो, शेतीचे नुकसान होते, व्यवसाय बुडतो, नोकरी नाहीशी होते, रोजगार जातो अशावेळी त्यांनी काय करावे त्यासाठी अशा जोखमीच्या काळात त्यांना ही मदत आवश्यक आहे.

९) **असमानता व स्थिर अर्थव्यवस्था :** देशात आर्थिक असमानता असल्यामुळे अर्थव्यवस्थेमध्ये स्थिरता प्रस्थापित होत नाही परिणामी देशाचा विकास होत नाही. कोणत्याही देशाचा विकास होण्यासाठी प्रथम, चांगली कार्य करणारी अर्थव्यवस्था असणे आणि सर्वात वाईट परिस्थितीत असलेल्या लोकांसाठी उदार असणे अर्थात असमानता कमी करण्यासाठी प्रयत्न करणे अत्यंत आवश्यक आहे. यासाठी श्रीमंत लोकांवर जास्त कर लावून अधिक उदार कल्याणकारी राज्याकडे वाटचाल केली पाहिजे. त्यामुळे अर्थव्यवस्थेमध्ये स्थिरता प्रस्थापित होण्यास मदत होते.

१०) **पुअर इकॉनॉमिक्स :** २०११ मध्ये अभिजीत बॅनर्जी व त्यांच्या पत्नी एस्थर डुफ्लो यांनी मिळून 'पुअर इकॉनॉमिक्स' नावाचा ग्रंथ प्रकाशित केला असून त्या ग्रंथामध्ये त्यांनी गरिबीचे अर्थकारण या विषयावर आपले विचार मांडले आहेत. या पुस्तकात त्यांनी गरिबीचा फेरविचार आणि जागतिक गरिबी संपविण्याचे मार्ग सांगितले असल्याचे दिसून येते.

११) **गुड इकॉनॉमिक्स :** डॉ.अभिजीत बॅनर्जी व त्यांच्या पत्नी एस्थर डुफ्लो यांनी मिळून २०१९ मध्ये गुड इकॉनॉमिक्स फॉर हार्ड टाइम्स : बेटर अन्सर्स टू अवर बिगेस्ट प्रॉब्लेम्स नावाचा ग्रंथ प्रकाशित केला. त्या ग्रंथामध्ये त्यांनी आर्थिक वाढीचा दर कमी होत जाणं स्थलांतर विषमता पर्यावरणाचा ऱ्हास जागतिकरण आणि तंत्रज्ञानाच्या वापरामुळे निर्माण होणारी बेकारी अशा अनेक प्रश्नांवर या पुस्तकांमध्ये भाष्य केले असल्याचे दिसून येते.

१२) **अब्दुल लतीफ जमील पावर्टी ऍक्शन लॅब :** अमेरिकेत अनेक अर्थशास्त्रज्ञ एकत्र येवून अब्दुल लतीफ जमील पावर्टी ऍक्शन लॅब २००३ रोजी स्थापन केली. या लॅबच्या माध्यमातून त्यांनी जगातलं दारिद्र्य दूर व्हावं यासाठी प्रयत्न केले. अभिजीत आणि त्यांच्या सहकार्याने स्थापन केलेली ही संस्था म्हणजे एक संशोधन केंद्र आहे येथे जगातील गरिबीवर मात करण्यासाठी काय करता येईल याबद्दल विज्ञानाचा आधार घेऊन संशोधन कार्य केले जाते. ही संस्था देशभरातील अनेक सरकार, सेवाभावी संस्था, स्वयंसेवी संस्था आणि वेगवेगळ्या संस्थांच्या सोबतीने गरिबी हटविण्यासंदर्भात काय करता येईल याबद्दलचे काम करते २०१८ पर्यंत ४०० दशलक्ष लोकांना या संस्थेशी संबंधित कामाचा फायदा झाला असल्याचे अभिजीत बॅनर्जी सांगतात यावरून या संस्थेची उपयोगिता किती आहे ते स्पष्ट होते.

१३) **अर्थशास्त्र शिकणाऱ्या तरुण विद्यार्थ्यांना संदेश :** अर्थशास्त्राचे अध्ययन करणाऱ्या तरुण विद्यार्थ्यांना अभिजीत बॅनर्जी संदेश देतात की, ज्यादा पगार दिला जातो म्हणून त्या ठिकाणी काम न करता तुम्हाला एखादी गोष्ट करण्याची आवड वाटत असेल तर ती कोणत्याही ठिकाणी करा वाढीव पगार सोयीसुविधा इत्यादी प्रलोभनांकडे दुर्लक्ष करा. कारण ज्या गोष्टीची आवड असते त्या गोष्टी करण्यात प्रचंड उत्साह असतो. परिणामी आपल्या हातून चांगले काम होते.

थोडक्यात अभिजीत बॅनर्जी हे समृद्ध समाज निर्माण करण्यासाठी धोरणात्मक उपाय शोधण्यात सक्रिय असून त्यांच्या संशोधनाने अर्थशास्त्राच्या क्षेत्रात नवीन दृष्टीकोन विकसित होण्यास मदत केली असल्याचे निदर्शनास येते.

**निष्कर्ष :**

१) जगप्रसिद्ध नोबेल पारितोषिकाने अर्थशास्त्राच्या अभ्यासात महत्त्वपूर्ण योगदान दिले असून आर्थिक विचार व सिद्धांत विकसित करण्यास जगभरातील संशोधकांना प्रेरित केले असल्याचे दिसून येते.

२) अभिजीत बॅनर्जी यांनी जागतिक गरिबी कमी करण्यासाठी संशोधन केले त्यामुळे त्यांना २०१९ चे अर्थशास्त्रातील नोबेल विभागून मिळाले असून त्यांनी केलेल्या संशोधनामुळे ते जगप्रसिद्ध भारतीय अर्थशास्त्रज्ञ म्हणून ओळखले जातात.

३) अर्थशास्त्रातील नोबेल मिळवणारे डॉ.अमर्त्य सेन हे पहिले भारतीय असून डॉ.अभिजीत बॅनर्जी हे दुसरे भारतीय आहेत.

४) अभिजीत बॅनर्जी हे समृद्ध समाज निर्माण करण्यासाठी धोरणात्मक उपाय शोधण्यात सक्रिय असून त्यांच्या संशोधनाने अर्थशास्त्राच्या क्षेत्रात नवीन विचार व दृष्टीकोन विकसित होण्यास मदत झाली असल्याचे निदर्शनास येते.

५) डॉ.अभिजीत बॅनर्जी यांनी मांडलेले आर्थिक विचार व विविध संकल्पना विकसनशील राष्ट्रांना विकासासाठी दिशादर्शक ठरत आहेत.

**शिफारशी:**

१) डॉ.अभिजीत बॅनर्जी यांचे आर्थिक विचार व संकल्पना विकसनशील राष्ट्रांनी लागू कराव्यात.

२) भारतात डॉ.अभिजीत बॅनर्जी यांच्या मदतीने अमेरिकेच्या धरतीवर पावर्टी ऍक्शन लॅब स्थापन करावी.

**संदर्भ ग्रंथ :**


१) गोडबोले अच्युत (२०२२) 'अर्थात' मधुश्री पब्लिकेशन,पुणे.

२) बॅनर्जी अभिजीत व एस्थर डुफ्लो (२०२१) 'गुड इकॉनॉमिक्स फॉर हार्ड टाइम्स : बेटर अन्सर्स टू अवर बिगेस्ट प्रॉब्लेम्स' मंजूल पब्लिशिंग हाऊस गोपाल.

३) बॅनर्जी अभिजीत व एस्थर डुफ्लो (२०२१) 'गरिबीचे अर्थकारण' मनोविकास प्रकाशन पुणे.

४) दैनिक लोकसत्ता दिनांक १५ ऑक्टोबर २०१९

५) https://divyamarathi.bhaskar.com/special-interview-of-nobel-winner-abhijit-banerjee-125931063.html/

६) https://www.indiatoday.in/india/story/nationalism-takes-away-from-poverty-issues-warns-nobel-laureate-abhijit-banerjee-exclusive-1609548-2019-10-15

७) https://hindi.oneindia.com/news/india/nobel-winner-abhijit-banerjee-nationalism-diverts-attention-528928.html

८) https://www.britannica.com/money/Abhijit-Banerjee

९) https://m.economictimes.com/news/politics-and-nation/nobel-laureates-abhijit-banerjee-and-esther-duflo-on-free-trade-and-growth-from-their-forthcoming-book-good-economics-for-hard-times/articleshow/71586879.cms

१०) https://www.povertyactionlab.org/